MHPU080012292022

**सं. फौजदारी खटला क्र. ६३२/२०२२**

**विशाल विरुध्द शुभम**

**निशाणी ४२**

सदर अर्ज आरोपीतर्फे फिर्यादीचा परत उलटतपास घेण्याकरीता आहे.

२) अर्ज, म्हणणे व प्रकरणाचे अवलोकन केले.

३) दोन्ही बाजूचा युक्तिवाद ऐकला.

४) अर्जाप्रमाणे आरोपीचे थोडक्यात कथन असे की, फिर्यादीने दरम्यान खाते उतारा दाखल केला असून त्यास निशाणी देखील देण्यात आलेली आहे. सदर खाते उताऱ्यावरती आरोपीस उलटतपास घेणे आवश्यक आहे.

५) समोरील बाजूचे कथन थोडक्यात असे की, अर्ज खरा, योग्य व प्रामाणिक नसून तो फिर्यादीला मान्य व कबूल नाही. त्यांची सदर अर्जास सक्त हरकत आहे. शेवटी अर्ज नामंजूर करणेची विनंती केली.

६) यापूर्वी फिर्यादीचा उलटतपास पूर्ण झालेला आहे. फिर्यादीचे उलटतपासानंतर फिर्यादीतर्फे दुसऱ्या साक्षीदाराचा उलटतपास देखील झालेला आहे. फिर्यादीच्या उलटतपासानंतर दि. २१/०९/२०२४ रोजी फिर्यादीतर्फे खाते उतारा दाखल केल्यानंतर खाते उतारा दाखल करण्यास म्हणणे दाखल केले नाही म्हणून त्यास निशाणी देण्यात आलेली आहे. खाते उताऱ्यावरती समोरील बाजूस संधी देणे आवश्यक आहे. त्या संबंधाने उलटतपासास संधी देणे आवश्यक आहे. करिता खालील आदेश.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करणेत येतो.

२. फिर्यादीचा पुढील उलटतपास केवळ खाते उताऱ्याच्या संबंधाने मर्यादित राहील.

SHARAD GINYANADEV DUBALE

Digitally signed by SHARAD GINYANADEV DUBALE
Date: 2025.02.06 15:43:02 +0530

(श.गि.दुबाले)

दिनांक – ०६/०२/२०२५

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

खडकी, पुणे.